*Indian Streams Reserach Journal*
*Vol.2,Issue.I/ Feb; 12pp.1-4*  **ISSN:-2230-7850**

**Research Papers**

# महात्मा फुलेंचे शेतकऱ्यांविषयीचे विचार

डॉ. करपे आर. एन.
प्रतिष्ठान महाविद्यालय,पैठण.
जि. औरंगाबाद.

## प्रस्तावना :–

जागतिक पातळीवर भारत एक कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. या देशातील बहुसंख्य लोकांचे जीवन जगण्याचे मुख्य साधन शेती हेच आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा ज्योतीबा फुल्यांनी भारतीय शेती व शेतकरी या बाबत मुलभूत चिंतन केल्याचे दिसून येते. भारतीय समाजजीवनाच्या संदर्भात एकोणिसाव्या शतकाला विशेष स्वरूपाचे महत्व द्यावे लागते. पारंपारिक, मध्ययुगीन समाजसंबंधांना प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे या शतकात धक्के बसत गेले. याच शतकात वसाहतवादी ब्रिटीश राजवट स्थापन झाली. या राजवटीने भारतीय शेती व शेतकऱ्यांचे प्रचंड मोठे शोषण केले. त्यांची आर्थिक धोरणे, जमीन महसूलीच्या नव्या पध्दती, वसाहतवादी प्रशासन व न्यायदान पध्दत, हस्तोद्योगांचा ऱ्हास व त्यामुळे जमिनीवर पडणारा लोकांचा वाढता भार आदींमुळे शेती–व्यवस्थेवर प्रतिकुल परिणाम घडून आला आणि शेतकरी अधिकाधिक दरीद्री होत गेला.

ब्रिटीश सत्तेने राबविलेली सारी धोरणे ही 'अत्यल्प गुंतवणूक–जास्तीत जास्त मुनाफा' या सुत्रावर आधारीत होती. या विशाल देशाचे शोषण एक मोठे आव्हान तर होतेच त्यातूनच ग्रामीण भागात शोषीतांचा मोठा वर्ग निर्माण झाला. या वर्गाच्या भावभावनांची नोंद घेणारे आणि समकालीन वास्तव जसेच्या तसे मांडणारे एक समाज क्रांतीकारक म्हणून म.फुल्यांची नोंद करावी लागेल.1

शेती आणि शेतकरी हा आपल्या केवळ अर्थव्यवस्थेचाच नव्हे तर संपूर्ण समाज–रचनेचाच कणा असून जोपर्यंत त्याची स्थिती सुधारत नाही तोपर्यंत कोणतेही मौलिक स्वरूपाचे सामाजिक परिवर्तन येथे घडून येण्याची शक्यता नाही. हे भाकीत जोतीराव फुल्यांनी एकशेवीस वर्षापुर्वी केले होते. परंतु स्वातंत्र्योत्तर कालखंडातही त्याचा फारसा गंभीर विचार आम्ही केलेला दिसत नाही. म्हणूनच उत्तरोत्तर शेतकऱ्यांची स्थिती अधिकच खालावत गेली. त्याचा परिणाम म्हणून आजचा शेतकरी आत्महत्येसारख्या अघोरी मार्गाचा अवलंब करताना दिसत आहे.

भारतीय शेती ही निसर्गाधीन असून तिला सातत्याने दुष्काळाचा सामना करावा लागतो. 19 व्या शतकामध्येच देशात आणि महाराष्ट्रातही प्रचंड मोठया प्रमाणात दुष्काळ पडले. सन 1876–77 चा दुष्काळ 19 व्या शतकातील सर्वात मोठा भीषण दुष्काळ समजला जातो. एकटया मुंबई प्रांतात आठ लाख बळी गेल्याची नोंद पाहायला मिळते.3 या दुष्काळाची झळ सर्वच ग्रामीण भागाला पोचत असली तरी नेहमी प्रमाणेच त्याचा सर्वात जास्त तडाखा भुमिहीन, शेतमजूर, गरीब व मध्यम शेतकरी जनतेला बसला. एकीकडे निसर्ग निर्मित आपत्ती तर दुसरीकडे वसाहतवादी ब्रिटीशसत्ता व भट–पुरोहितांच्याकडून इथल्या शेतकऱ्यांचे प्रचंड मोठया प्रमाणावरती शोषण होत होते. शुद्र शेतकऱ्यांच्या होणाऱ्या दैन्यवाण्या परिस्थितीचे गाऱ्हाणे शेतकऱ्यांचा आसूड 1883 साली लिहून म. फुल्यांनीच पहिल्यांदा वेशीवर टांगले. शेतकऱ्यांच्या दारीद्रयाचे मुळ त्यांच्या अज्ञानात आहे असे स्पष्ट करताना ते आपल्या ग्रंथाच्या उपोद्‌घतात म्हणतात.

विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली,
नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले,
वित्तविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.

म.फुले पुर्वकालीन हिंदुस्थानात सर्वसाधारण जनसामान्यांच्या अंगाने हया प्रक्रियेलाच मुळी बांध घालण्यात आला. फुलण्याचे / विकसीत होण्याचे मार्ग कुंठीत करण्यात आले. पुढे ते आपोआपच बुजत गेले. त्यामुळे अनेक अनर्थांना आमंत्रण मिळाले. त्या कारणे शुद्रातिशुद्र तर खचलेच, पण मोठा अनर्थ झाला तो शुद्र शेतकऱ्यांबाबत. अविद्येमुळे शुद्र शेतकरी मुख्यतः दैन्यवाण्या स्थितीस येऊन पोहोचला. विशीर्ण धर्म, कालबाहय धर्मग्रंथ, जातीय विभाजन व अंधश्रध्दा यावर अधिष्ठित असलेला समाज व्यवस्थेच्या जोडीला अविद्या आली. साऱ्यांनी मिळून गळे–मिठी घातली आणि त्यातून ज्ञानासंबंधी अनास्था निर्माण झाली. अनिष्ठ परंपरा आणि पारंपारिक अंधश्रध्दा यांच्या गुंतवळ्यात अडकून पडलेल्या शुद्रजणांना नेमके काय घडले आहे, याचा मुळात पत्ताच लागला नाही. परिणामी

दुःखच दुःख शुद्र शेतकऱ्यांच्या वाटेला आले. जोतीबांनी लिहीलेला शेतकऱ्यांचा आसूड हा ग्रामीण भागात पसरलेल्या शेतकरी लोकांच्या दुःखाचा जाहीरनामा होय. भारतीय व्यवस्थेच्या संदर्भात शेतकरी वर्गाचा सरसकटपणे शुद्र म्हणून उल्लेख सर्वप्रथम फुल्यांनी केला. या आधाराने त्यांनी शेतकरी समाजातील समस्यांचे, अरिष्टांचे सविस्तर विवेचन केले. या विवेचनाचा मुख्य आधार म्हणजे शेतकरी समाजाचे सूक्ष्म अवलोकन हेच आहे. त्यांनी प्रत्यक्षपणे महाराष्ट्रात शेतकरी चळवळ उभी केली नसली5 तरी त्या काळी व स्वातंत्र्योत्तर काळातही महाराष्ट्रामधे आणि एकूणच देशभरात शेतकऱ्यांच्या प्रश्नावरती जे लढे उभे राहीले, ज्या चळवळी उभ्या राहील्या त्यांनी म.ज्योतीबा फुल्यांच्या विचार व कार्यापासूनच प्रेरणा घेतल्याचे दिसते.

समाजात जे जे पिडीत व शोषित होते त्या सर्वांचा कैवार जोतीबांनी घेतलेला आहे. रयत अथवा शेतकरी समाजात बहुसंख्येने असणारा वर्ग होता तो दैन्य व दारिद्र्य यातच पिचला गेला होता. शेतकऱ्यांच्या या दैन्यावस्थेला खेड्यामधील भटभिक्षुक, गुजर, मारवाडी, ब्राम्हण, सावकार आणि सावकारी खात्यातील भट कामगार कसे जबाबदार आहेत याचे वास्तव चित्रण जोतीबांनी आपल्या ग्रंथातून केले आहे. अडाणी देवभोळा शेतकरी या सर्वांकडून नाडला जात होता. त्याचे सावकाराकडून कसे शोषण होत होते हे जोतीराव सांगतात.

हिशोबी घोळ। सर्व गोंधळ। वाढवी कर्ज डोईवर।।
आतून होई सावकार। पैसे देई गहाणावर।।
तगादा धाडी पाठीवर। दामदुप्पट सर्व एकवट।।
नोंदणी गहाण खतावर। दुमाला पुस्त रजिस्टर।।

जोतीरावांनी रेखाटलेले हे चित्र शेतीत खपणाऱ्या कष्टाळू, अज्ञानी शेतकऱ्यांच्या कंगाल दीनवाण्या स्थितीचे तर आहेच पण खानदानी संबंधामुळे मराठ्यांचा डौल घालून शेखी मिरविणाऱ्या एक मजली कौलारू घर आणि आठ बैली जुना गाडा यांचा मालक असलेल्या आणि तरीही कर्जबाजारी, अज्ञानी कुणब्यांच्या हल्लीच्या वास्तविक स्थितीचा मासला त्यांनी पुढे ठेवला आहे. त्यांचे घर एक मजली कौलारू आहे. घराचे पुढच्या बाजूस घरालगत आढीमेंढी टाकून बैल बांधण्याकरता छपरांचा गोठा केला आहे. त्यात दोन–तीन उठवणीस आलेले बैल रवंथ करीत आहे. बाहेर अंगणात एका बाजूला खंडी सवा खंडीच्या दोन–तीन रिकाम्या कणगी कोपऱ्यात पडल्या आहेत. बाहेर अंगणात एका बाजूस एक आठ पैली जुना गाडा उभा केला आहे. त्यावर मोडकळीस आलेल्या तुराट्यांचा करकुल पडला आहे. डावे बाजूला एक मोठा चौरस ओटा करुन त्यावर एक तुळशी वृंदावन बांधले आहे. त्यावर पाण्याने भरलेले मातीचे दोन–तीन डेरे व घागरी ठेविल्या आहेत. पाणई शेजारी तीन बाजूला छाट दिवली बांधून त्याचे आत ओबड–धोबड फरशा टाकून एक लहानशी न्हाणी केली आहे. तिच्या मोरी वाटे वाहून गेलेल्या पाण्याने बाहेरचे बाजूस लहानसे डबके साचले आहे, त्यामध्ये किड्यांची बुचबुच झाली आहे. त्यांचे पलीकडे पांढऱ्या चापऱ्याखाली उघडी–नागडी, सर्व अंगावर पाण्याचे ओघळाचे डाग पडलेले असून खर्जुली, डोक्यात खवडे, नाकाखाली शेंबडाच्या नाळी पडून घामट अशा मुलांचा जमाव जमला आहे.

शेतीच्या आधुनिककीकरणच्या बाबतीतही त्यांनी ब्रिटीशांना काही महत्वपूर्ण सूचना केल्या होत्या. त्या अपेक्षांची पुर्ती होत नसल्याची खंत त्यांच्या या सूचनांमधून व्यक्त होते. सरकारी गोरे अधिकारी बहुतकरुन ऐषआरामात गुंग असल्याने त्यांना शेतकऱ्याच्या वास्तविक स्थिती बद्दल माहिती करुन घेण्यापुरती सवड होत नाही व या त्यांच्या गाफील पणाने एकंदर सर्व सरकारी खात्यात ब्राम्हण कामगारांचे प्राबल्य असते. दोन्ही कारणामुळे शेतकरी लोक इतके लुटले जातात की, त्यास पोटभर भाकर व अंगभर वस्त्र मिळत नाही.8 ब्रिटीशांचे वसाहतवादी डोळेझाक धोरण व प्रशासनातील भ्रष्ट ब्राम्हणवर्गाचे प्राबल्य ही दोन कारणे शेतकऱ्यांच्या अज्ञानासह शेतकऱ्यांच्या दुरावस्थेस कारणीभूत असल्याचे फुले सांगतात.

शेतकऱ्यांच्या प्रश्नाला जोतीरावांनी हात घातला तो मोठ्या व्यापक भुमीकेतून. शेतकऱ्यांची परिस्थिती फार केवीलवाणी आहे, त्यांच्यावर दया करा, अशी भिकेची किंकाळी त्यांनी मारली नाही. शेतकरी कष्ट करतो, राबतो पण त्याच्या कष्टाचे फळ लुटून नेले जाते. प्रथमतः भटशाहीकडुन उरले सूरले इंग्रजांकडुन हे शोषण फार पुराणे आहे. त्याची सुरुवात पेंढारी, कहीवाले, मागून सरदार, राजेरजवाडे यांच्या लुटीतून होते, बेठबिगार, धर्मव्यवस्था, कारभार, अपुऱ्या किंमती हे सर्व शेतीच्या लुटीचे प्रकार आहेत. ही जाणीव झाल्यानंतर त्यांनी शेतीच्या लुटीचा एक इतिहास आणि विचार पध्दती पुढे मांडली.9 आजवरच्या कोणत्याही मांडणीत संपत्ती, उत्पादक शेतकऱ्याला स्थान नव्हते ते म.फुल्यांच्या मांडणीत आहे.

म.जोतीबा फुल्यांनी त्यांच्या लिखाणतून मिथकांचा मोठ्या खुबीने वापर केला. त्यांचे विश्लेषण करीत असताना त्यांना संपूर्ण नवे रूप दिले आणि महाराष्ट्रातील शुद्रातीशुद्र समाजाच्या हातामध्ये नवे वैचारीक हत्यार दिले. प्रस्थापीत वैदिक व ब्राम्हणी संस्कृतीचे वैचारीक प्रभूत्व संपुष्ठात आणण्यासाठी त्यांनी भारतीय परंपरेत बळीराजाचे मिथक होते त्यास नवा आशय प्रदान केला. बळीराजाला एक नवा ऐतिहासीक अर्थ, नवे राजकीय परिमाण त्यांनी प्राप्त करून दिले.

बळी हा प्रल्हादाचा नातू त्याचे राज्य फार मोठे होते जोतीबा खंडोबा मल्हारी, म्हसोबा, मार्तंड, भैरोबा वगैरे क्षेत्रपती त्यांचे वेगवेगळे मंत्री आणि अधिकारी होते. बळीच्या प्रत्येक प्रांताचा प्रमुख हा खंडोबा होता. शत्रुला समोरा समोरच्या लढाईत चीत करणारा मार्तंड त्याचा सैन्याचा प्रमुख होता. म्हसोबा हा त्याचा न्यायाधिकारी होता. महात्मा फुले यांच्या मते बळीराजा आणि त्यांचे सर्व राज्याधिकारी स्वकार्य दक्ष होते. त्याच्या या न्यायी कारभारामुळे लोक अजुनही त्याची आठवण करताना दिसून येतात.

म. फुले यांच्या मते बळीचे वाढते सामर्थ्य आणि दरारा आर्यांना सहन झाला नाही. म्हणून वामन नावाच्या सेनापतीच्या नेतृत्त्वाखाली त्यांनी बळीच्या राज्यावर हल्ला केला. वामनाने या लढाईत बळीचा पराभव केला. लढाईत बळी मृत्युमुखी पडला. त्याची पत्नी विंध्यावली सती गेली. वामनाच्या सैन्याने ऐन दसऱ्याच्या दिवशी राजधानीत प्रवेश करून लुट केली.10

म. फुले वामनास ब्राम्हणांचा प्रतिनिधी मानतात आणि ब्राम्हणात सध्या प्रचलीत असणाऱ्या काही रूढींचा ते आपला मुद्दा सिध्द करण्यासाठी उपयोग करतात. त्यांच्या मते दसऱ्याच्या दिवशी ज्यावेळी ब्राम्हण शिलंगण करून घरी येतो त्यावेळी संध्याकाळी त्याची बायको कणकेच्या पिठाची मुर्ती तयार करते आणि ती मुर्ती दाराच्या उंबरठ्यावर ठेवली जाते. ब्राम्हण घरी आल्यावर एका काडीने त्या मुर्तीचे पोट फोडतो आणि घरात प्रवेश करतो. परंतु ज्यावेळी ब्राम्हणोत्तर जातीतील लोक त्या दिवशी घरी येतात यावेळी त्यांच्या बायका त्यांना 'इडा पिडा जाओ बळीचे राज्य येवो' असे म्हणून ओवाळतात. कारण दुसरा बळी येऊन देवाचे राज्य स्थापील अशी त्याची खात्री असते11 पुढे मध्ययुगात शेतकऱ्यांचे राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न हा शिवाजी महाराजांनी केला. त्या छत्रपती शिवरायांना त्यांनी कुळवाडी भूषण म्हणून संबोधले

लंगोट्यास देई जानवी पोषींदा कुणब्यांचा।
काळ तो असे यवनांचा ।।12

शिवाजी महाराजांची प्रजा म्हणजे सामान्य शेतकरी होता. कुणब्याचा राजा म्हणून जोतीबांनी शिवरायांचा गौरव केला. जोतीबांचा त्या काळच्या राष्ट्रीय सभेच्या नेत्यांवरही मुळीच विश्वास नव्हता. जो पर्यंत कॉंग्रेसचे नेते महार, मांग आणि शेतकरी यांच्या हिताची कळवळ बाळगीत नाहीत तो पर्यंत राष्ट्रीय होऊच शकत नाही, असे त्यांचे मत होते. राष्ट्रीय सभा ही तिच्या आरंभीच्या काळात मुठभर सुशिक्षित देशाभिमानी आणि प्रबुध्द लोकांची संस्था होती.

हिंदी राज्यकारभार चालविणाऱ्या शासन संस्थेत हिंदी लोकांना कांही अधिकाराच्या जागा मिळाव्यात अशी त्यांची मागणी होती.

इंग्रजी राजवटीच्या विरूध्दही जोतीबांची तक्रार होती. महार, मांग, शेतकरी आणि कामगार लोक यांच्याकडे इंग्रज सरकार दुर्लक्ष करते असा त्यांचा आरोप होता. जोतीबाकालीन सार्वजनिक सभे सारख्या काही संस्था दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तीकडे सरकारचे लक्ष वेधत होत्या. परंतु शेतकरी लग्न समारंभामध्ये मोठ्या प्रमाणात उधळपट्टी करतात. सार्वजनिक सभेचे हे मत जोतीबांना मान्य नव्हते त्यांचे म्हणने असे होते की, हिंदुधर्माच्या नावाने सार्वजनिक सभा आणि काँग्रेस ह्या संस्था–करवी ब्राम्हण लोक हक्क मिळविण्याची चळवळ करतात. परंतू हे हक्क स्वतःच्या फायद्यासाठी उपटतात. हिंदु धर्मातील इतर वर्गापर्यंत त्या हक्कांचे लोण जाऊ देत नाहीत.

स्त्री–शुद्र आणि शेतकरी हा फुलेवादाचा मध्यवर्ती धागा आहे. समकालीन समाजात या वर्गाचे होणारे शोषण थांबविण्यासाठी त्यांची ऐतिहासिक कारणमीमांसा त्यांनी केली आणि व्यापक संघटनेसाठी वैचारीक बैठक उभी केली. ग्रामीण भागातील समग्र शेतकरी त्यांनी विचारात घेतला. शेती शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे कारण शोधतांना केवळ भट–ब्राम्हणावरच खापर फोडले नाही तर शेतकरी समाजाच्या दोषावरही त्यांनी प्रखर टीका केली.

एकूण भारतीय परंपरेत शेतीचा एवढ्या गंभीरपणे कुणी विचारच केला नव्हता. फुल्यांच्या समकालीन सुधारकांनाही कधी शेती, शेतकऱ्यांबद्दल विचार करावेसे वाटले नाही. वर्गीय दृष्टीकोनातून पाहिले तर फुले हे मुख्यतः शेतकऱ्याचे प्रवक्ते होते. भरतातील शेतकरी क्रांतीचे अग्रदुत म्हणून फुल्यांची दखल आजही घ्यावी लागते.15 त्यांच्या या एकूण विचार व कार्याबद्दल जनतेने त्यांना उत्स्फूर्तपणे महात्मा ही पदवी बहाल केली. आधुनिक भारतातील दलित आणि कनिष्ठ वर्गाकडून उच्चतम अशी ही पदवी मिळविलेला पहिला महापुरूष म्हणजे जोतीरावच होता.

संदर्भ ग्रंथ :–

1. महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ – श्रीकांत साळुंके, बी. रघुनाथ प्रकाशन, परभणी, प्रथम आवृत्ती–1996 पृ.16
2 उपरोक्त – पृ.1
3 महाराष्ट्रातील दुष्काळ – दत्ता देसाई, मागोवा प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती –1 मे 1987, पृ.15
4 महात्मा फुले समग्र वाड्मय –संपा. मालशे / कीर म. राजन, पृ.253
5 श्रीकांत साळुंके, उपरोक्त –पृ. 16,17
6 महात्मा फुले समग्र वाड्मय –पृ. 110,111
7 महात्मा फुले समग्र वाड्मय –पृ. 235,236
8 शेतकऱ्याचा आसूड – जोतीराव गोविंदराव फुले संपा. डॉ. एस. एस. भोसले, जिजाऊ प्रकाशन, दुसरी आवृत्ती –2001, पृ. 85
9 महात्मा फुले : शोधाच्या नव्या वाटा संपा. हरी नरके (कृषीअर्थशास्त्रज्ञ शरद जोशी), प्रकाशक – प्रधान सायेव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, पृ. 191